Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७१९ . वा | सोमवार | दि. २५ मार्च २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये







# सर्वच कार्यकर्त्यांना पदाधिकाऱ्यांना नियोजन बद्ध सांभाळणारा खासदार हवा...

## जिल्हाभरात चर्चांना उधाण, प्रतापरावांबाबत नाराजी शिखरावर

## दीड लाख महिलांना उद्योजिका बनविणारा बुलडाणा अर्बन मॅनेजमेंट सर्व्हिसेसचा क्रांतिकारी उपक्रम !

**जनसंचलन/बुलढाणा**

- जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाचे वर्चस्व हे गेल्या अनेक वर्षांपासून आहे. यासोबतच राष्ट्रीय स्वयंसंवेक संघ आणि इतर हिंदुत्ववादी संघटनांचे जाळे चांगले आहे. हे कार्यकर्ते फारशा कोणाकडून अपेक्षा ठेवून नसतात. परंतु कमीत कमी एखाद्या संकटाच्या वेळेस किंवा अडल्या-नडल्या वेळेस आपला एखादा खंबीर लोकप्रतिनिधी खासदार आपल्याला सांभाळून घेणारा हवा, अशी त्यांची माफक अपेक्षा असते. परंतु प्रतापरावांनी गेल्या १५ वर्षांत खासदारकी भोगून देखील सातत्याने भाजप व संघाच्या कार्यकर्त्यांची घोर उपेक्षा केली. त्यामुळे आतातरी किमान कार्यकर्त्यांना सांभाळून घेणारा खासदार हवा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. लोकसभा निवडणुका जाहीर झाल्यापासून सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन सातत्याने जनमानसाचा कानोसा घेण्याचा प्रयत्न करीत आहे. निवडणुका हाच असा काळ असतो की, जेंव्हा जनभावना अगदी टोकदार झालेल्या असतात. कारण बऱ्याच केसेसमध्ये चार-साडेचार वर्षे लोकप्रतिनिधी हे त्यांना निवडणुकीत मदत करणाऱ्या कार्यकर्त्यांना विसरून जातात. परंतु ऐन निवडणुकीच्या वेळेस त्यांना कार्यकर्त्यांची गरज असते. भाजप आणि संघाचे कार्यकर्ते हे पूर्ण पणे पक्ष-संघटनेच्या विचारांना समर्पित असतात. त्यांना पक्षाचा-संघटनेचा आदेश महत्वाचा असतो. हे जरी खरे असले, तरी कार्यकर्ता हा देखील एक माणूसच आहे. सामान्य माणसांप्रमाणे त्याच्याही गरजा असतात. त्यालाही राजकीय क्षेत्रात यशस्वी होण्याची स्वप्ने पडतात. परंतु प्रतापरावांसारखे लोकप्रतिनिधी हे या विषयांकडे सातत्याने डोळेझाक करीत असतात. त्यामुळेच यंदा भाजप तसेच रा. स्व. संघ व त्यांच्या इतर संघटनांमध्ये प्रतापरावांप्रति प्रचंड प्रमाणात रोष दिसून येतो आहे. भाजपचे बरेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते हे आतापर्यंत दबक्या आवाजात बोलत होते, परंतु संताप आता इतका जास्त होत चालला आहे की, तो उद्रेक दाबून ठेवणे कठीण झालेले आहे. खामगाव मतदार संघाचे आमदार आकाश फुंडकर व माजी मंत्री तथा जळगाव जामोद मतदार संघाचे आमदार संजय कुटे यांनी महायुती मेळाव्यात जाहीर नाराजी व्यक्त केली तसेच जिल्ह्यातील पदाधिकार भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष वानखेडे यांनी काल माध्यमांना सांगितले की, प्रतापराव हे सातत्याने भाजपचे नेते व कार्यकर्त्यांना डावलण्याचा प्रयत्न करतात. विविध संस्थांचे लोकप्रतिनिधी भाजप कार्यकर्त्यांना ते होऊ देत नाहीत. वानखेडे यांचे बोल हे प्रातिनिधिक आहेत.भाजपचा प्रत्येक पदाधिकारी-कार्यकर्ता तसेच संघाची मंडळीही दबक्या आवाजात हेच बोलत आहेत. म्हणूनच यंदा भाजप या ठिकाणी आपल्या उमेदवारासाठी प्रचंड आग्रही आहे. दुसरीकडे प्रतापराव हे निवडणूक लढण्यावर ठाम दिसून येत आहेत. या पेचात अद्यापही येथे उमेदवारी घोषित झालेली नाही. १५ वर्षे खासदारकीच्या काळात प्रतापरावांनी भाजप व संघाच्या कार्यकर्त्यांना साधे विचारले देखील नाही. एव्हढेच नाही तर बऱ्याच कार्यक्रमात त्यांनी भाजपच्या आमदार किंवा इतर लोकप्रतिनिधींनाही डावलण्याचे काम केले. ज्या भाजपच्या भरोश्यावर निवडणूक लढवायची. मोदीजींना पुन्हा पंतप्रधान करण्याचे आश्वासन देऊन भाजप व संघ कार्यकर्त्यांना इमोशनल ब्लॅकमेल करायचे व त्याच भरोश्यावर निवडून यायचे, हा प्रकार आता भाजप कार्यकर्ते सहन करण्याच्या अजिबात मनःस्थितीत नाहीत, हे सूर्यप्रकाशाएव्हढे स्पष्ट झालेले आहे. दुसरीकडे लोकसभेचे दुसरे दावेदार बुलडाणा अर्बन सर्वेसर्वा राधेश्याम चांडक उर्फ भाईजी आहेत. भाईजी हे कुठल्याही पक्ष-संघटनेत असोत, परंतु भाजप व विशेषतः संघाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये त्यांच्याबद्दल प्रचंड आदर आहे. भाईजी विकास पुरुष यांच्यासारखा खासदार भविष्यात असला, तर भाजप-संघाच्या कार्यकर्त्यांसाठी ही फार जमेची बाजू असणार आहे. नेमकी हीच बाब भाजपकडून भाईजींची उमेदवारी बळकट करण्यासाठी महत्वाची ठरणार आहे. भाईजींकडे असलेली विकासाची दृष्टी, सर्वांना सोबत घेऊन जाण्याची त्यांची प्रवृत्ती, बुलढाणा अर्बनच्या माध्यमातून किंवा आपल्या नगराध्यक्षपदाच्या कार्यकाळात केलेला विकासाचा झंझावात, जिल्हाच नव्हे तर राज्यभर असलेले त्यांचे नेटवर्क, यामध्ये कुठेही प्रतापराव हे समसमान तुलनेने बसत नाहीत. म्हणूनच प्रतापरावांची यंदा लोकसभेची वाट सध्यातरी बंद झाल्यासारखी दिसत आहे. एक-दोन दिवसांत सगळे चित्र स्पष्ट होईलच. तोपर्यंत अंतर्गत चर्चा, कुजबुज हे सुरूच राहणार, यात शंका नाही.

(मतदारांचा कानोसा...)

**बुलडाणा अर्बन परीवार संस्थापक अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यासह महाराष्ट्र भर बुलडाणा अर्बन परीवार हा अनेक सामाजिक उपक्रमात अग्रेसर असून बेरोजगारानां रोजगार व नोकऱ्या देऊन स्वतहाच्या पायावर उभे केले.असे कित्येक उदाहरणे आहेत. लोकप्रतिनिधीना जी बेरोजगारी व रोजगाराची कामे करावयाची ती सर्व कामे भाईजी चांडक यांनी कोणतीही राजकीय मदत न घेता करून दाखवत आहे. ज्याची अनेक उदाहरणे ही जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकांना माहिती आहे. आज बुलडाणा जिल्हा मागासलेला असल्याचे सर्वत्र बोलल्या जात आहे. मागासलेला शब्द आज पर्यंत कोणत्याही राजकीय पुढारी, लोकप्रतिनिधींनी पुसण्याचे धाडस दाखविले नाही हे सर्व शक्य आहे ते राधेश्याम चांडक यांच्या माध्यमातून २०२४ भाजपा लोकसभा उमेदवारी जाहीर केली तर जिल्ह्यातील प्रत्येक नागरिक त्यांच्या सोबत आहे. होणारी निवडणूक ही एकतर्फी बहुमताच निकाल देईल हे सत्य प्रत्येक मतदारांचा आत्म विश्वास मतदानात दाखवून देईल.**



## श्री शिंदे गुरुजी कन्या विद्यालयात जागतिक चिमणी दिन साजरा...

**जनसंचलन/बुलडाणा**

श्री शिंदे गुरुजी कन्या विद्यालयाच्या राष्ट्रीय हरित सेनेच्या विद्यार्थीनींनी २० मार्च २०२४ रोजी जागतिक चिमणी दिन साजरा केला. विद्यार्थ्यांनी विविध पक्षांची माहिती संकलित करून सादर केली. चिमणी या विषयावर विस्तृत माहिती विद्यार्थ्यांनी संकलित करून पर्यावरणाच्या दृष्टीने चिमणीचे महत्त्व चिमणी दिनाच्या निमित्ताने सादर केली. चिमणीचे चित्र काढून व चिमणी चे आवाज काढून मुलींनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. मुख्याध्यापिका डॉ. संजीवनीताई शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली सुलभाताई सोनूने यांनी कार्यक्रमाचे सुरेख आयोजन केले होते.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# उर्दू शाळेचा मुख्य रस्ता खुला करण्याची मागणी अन्यथा शाळा बंद आंदोलन...

**जनसंचलन/ चिखली**

चिखली पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या उदयनगर येथील जिल्हा परिषद उर्दू उच्च प्राथमिक शाळेकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याला लाव-लेले तारेचे कुंपन काढून सदर रस्ता खुला करण्याची मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, सदर रस्ता येत्या ७ दिवसात खुला करुन देण्यात यावा अन्यथा रस्ता खुला करुन न मिळाल्यास २६ मार्च २०२४ पासून शाळा बंद आंदोल छेडण्यात येईल व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसास झाल्यास याची संपुर्ण जवाबदारी हि प्रशास-नाची राहील याची नोंद घेण्यात यावी. जिल्हा परिषद उर्दू उच्च प्राथमिक शाळेच्या मुख्य रस्त्याला नारायण आत्माराम ठाकरे यांनी सुट्टीच्या दिवशी २५ वर्षापासून वापरात अस-लेला मुख्य रस्ता काटेरी तार व अँगल लावून कंपाऊड केला आहे. कुठलीही शेती मोजणी व धुरे मोजणी न करता सदर कंपाऊंड घालण्यात आले. त्यामुळे शाळेत मुलांना ये-जा करणे व शाळेत येणाऱ्या वाहतूकीसाठी मुख्य रस्ता बंद झालेला आहे. काटेरी कंपाऊंडमुळे शाळेतील तीन विद्यार्थ्यांना ईजा झाली आहे. विद्यार्थी खेळत असतांना



काटेरी तारावर पडतात व त्यांना काटेरी तारामुळे भविष्यात मोठी दुर्घटना नाकारता येत नाही. त्यामुळे सदर रस्ता खुला करण्याची मागणी होत आहे.निवेदनावर शेख शरीफ, शेख बिस्मिल्ला ,शेख नजीर , शेख इल्यास ,शेख रफीक, शेख सद्दाम, शेख वसीम, राजीक खान, बुडन भाई, मो.अस्लम यांच्या सह्या आहे.

# लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्कची कारवाई...

## आचारसंहिता कालावधीत १७ गुन्हे झाले दाखल...

**जनसंचलन/बुलढाणा**




लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्कने अवैध मध्यविक्रीबाबत कारवाई सुरू केली आहे. या कारवाईमध्ये आचारसंहिता लागू झाल्यापासून १७ गुन्हे नोंदविण्यात आले असून यात १७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच अडीच लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने चालू मार्च महिन्यात आतापर्यंत एकुण ६१ गुन्हे नोंदविले आहे. यात ६१ वारस गुन्हे, ६१ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच २ वा-हनासह एकुण २५ लाख ८१ हजार १४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यांमध्ये १६२.७४ लिटर देशी मद्य, ३४.७४ लिटर विदेशी मद्य, २८ लिटर ताडी, १० हजार ८२५ लिटर रसायन सडवा, ५९५ लिटर हातभट्टी, ११.५ लिटर बिअर मद्य पकडण्यात आले. आचारसंहिता कालावधीत अवैध मध्यविक्री विरोधात विशेष मोहिम राबवून एकूण १७ गुन्हे नोंदविण्यात आले आहे. यात १७ वारस गुन्हे नोंद करून १७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच २ वाहनासह एकुण २ लाख ५९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या गुन्ह्यांमध्ये देशी मद्य ५५.९३ लिटर, विदेशी मद्य १२.२४ लिटर, रसायन सडवा १ हजार ७८८ लिटर, हातभट्टी १२४ लिटर, बिअर ७.८ लिटर मद्य पकडण्यात आले आहे. तसेच विभागाकडून राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर सीमा तपासणी नाक्यावर चेकपोस्ट तयार करण्यात आले आहे. तसेच दैनंदीन मद्यविक्री माहितीचा भरणा केलेला नसलेल्या हॉटेल फ्रेण्डस, गौरव वाईनबार शे-गाव, हॉटेल विशाल शेगाव, हॉटेल न्यू अजय खामगाव, हॉटेल विश्वजित शेगाव, हॉटेल सुर्या शे-गाव, हॉटेल ग्रीनलॅण्ड बुलडाणा आणि हॉटेल विजय शेगाव यांच्या अनुज्ञप्ती ७ दिवसांसाठी निलंबित करण्यात आल्या आहेत. यानंतरही आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन केले नसल्यास अनुज्ञप्तीधारकांविरुद्ध कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच अनुज्ञप्तींची मद्यविक्री सरासरी-पेक्षा ३० टक्के जास्त किंवा कमी झाल्यास अशा अनुज्ञप्तींचे सख-ोल निरीक्षण करण्यात येणार आहे. तसेच परिसरात अवैध मद्य विक्री अथवा बनावट मद्यनिर्मिती आढळल्यास टोल फ्री नंबर १८००८३३३३३, व्हॉटसॲप नंबर ८४२२००११३३ किंवा excisesuvidha.mahaonline.gov.in या पोर्टलवर तात्काळ माहिती कळवावी, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्कच्या अधीक्षक भाग्यश्री जाधव यांनी केले आहे.

# आमदार निधीचा दुरुपयोग चौकशीची मागणी मुरादपूर येथील प्रकार.

**जनसंचलन/ चिखली**



चिखली तालुक्यातील व सिदखेडराजा मतदार संघातील मौजे मुरादपुर ता चिखली जि बुलढाणा मतदार संघ सिंदखेडराजा येथे पुर्वी झालेल्या मजबुत असलेल्या सिंमेट कामावरच पुन्हा सिमेंट रस्ता मुरादपुर येथे सदर आमदार निधी मिळावा यासाठी जि प बांधकाम विभाग यांच्याकडून सदर रस्ता पाहणी साठि ईजीनीयर जे ई शिंदे हे आले असता सदर रस्ता सिंमेट आहे व मजबूत आहे असे कळविण्यात आले होते तरी त्यानंतर २१/०८/२३ मा कार्यकारी अभियंता यांना आपले सरकार मार्फत तक्रार दाखल केली आहे पुन्हा २८ फेब्रुवारी २०२४ रोजी ईमेल द्वारे कळविले आहे तसेच मोबाईल फोन द्वारे सुध्दा चौकशी करुणच काम करावे असे वेळोवेळी तक्रार दाखल करुन सुध्दा सदर जि प बांधकाम विभाग ईजीनीयर शिंदे यांनी ग्रा प पदाधिकारी व ठेकेदार यांचा फायदा व्हावा व आर्थीक लाभ निधीचा दुरुपयोग करुण कसा मिळवता येईल या दृष्टीने सदर ईस्टीमेट बणवले व गावात ज्या ठिकाणी अजुन ही सिमेंट काँक्रिट रस्ता नाही अशे नागरिक सिमेंट काँक्रिट रस्त्यापासून वंचीत राहले हे असे झाले ज्या ठिकाणी पहिलेच काम आहे अशा ठिकाणी पुन्हा काम ज्या ठिकाणी पावसाळ्यात साधे चालता येत नाही अशा ठिकाणी फक्त आर्थिक लाभासाठी ते नागरिक वंचीत ठेवणार्या अशा कर्मचारी यांचेवर कारवाई व्ह-ावी साठि कार्यकारी अभियंता व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे तसेच यापुर्वी सुध्दा अशेच काम पुर्वी ग्रामपंचायत मरादपूर ने केलेल्या कामावरच आमदार निधीतून काम करण्यात आले होते सदर काम हे ग्रा प चा कोणताही ठराव न घेताच करण्यात आले होते त्याचीच पुनरावृत्ती पुन्हा एकदा मजबुत असलेल्या सिंमेट कामावरच पुन्हा एकदा काम करुन शासणाच्या निधीचा दुरुपयोग करण्यात आला आहे तरी सदर कामाची वरीष्ठ अधिकारी व विभागाकडून चौकशी व्हावी व सदर दिशाभूल करणारे यांच्यावर कारवाई व्हावी अशी मागणी मुरादपुरचे उपसरपंच विष्णु महाराज गाडेकर यांनी केली आहे

# हिवरखेड पूर्णा येथे पाण्याची टंचाई चा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सरपंच भारत वाघमारे यांचा पुढाकार

**जनसंचलन/ चिखली**



हिवरखेड पूर्णा येथे पाण्याची टंचाई चा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सरपंच भारत वाघमारे यांचा पुढाकार सिंदखेडराजा अनिल दराडे सिंदखेडराजा तालुक्यातील हिवरखेड पूर्णा येथे दहा ते पंधरा दिवसापासून पाणीटंचाई निर्माण झाली आहे ग्रामपंचायत विहीर अधिग्रहण करण्यासाठी विहीरी भरपूर आ-हेत परंतु त्यांची पाण्याची पातळी खोल गेली असल्यामुळे पाणी नाहीये त्यामुळे ग्रामपंचायतला मोठी अडचण निर्माण झाली पाणीपुरवठा करणारी विहीर नदीपात्रात असल्यामुळे गाळणे दबलेली आहे तिचे सुद्धा गाळ उपसा-चे काम क्रेन साह्याने चालू केले आहे परंतु तिला सुद्धा पाणी कमी प्रमाणात आहे जल जीवन मिशन योजनेअंतर्गत पाणीपुरवठ्याच्या विहिरीचे काम चालू आहे परंतु ते काम पूर्ण होण्यासाठी एक महिना कालावधी लागणार आहे तोपर्यंत काहीतरी पर्याय व्यवस्था करण्यासाठी ग्रामपंचायत सचिव गवई सरपंच सौ करुणा भारत वाघमारे व सदस्य रमेश नागरे नामदेव कुटे जितेंद्र वाघ हे गट विकास अधिकारी पंचायत समिती सिंदखेडराजा त्यांना लेखी निवेदन दि २६/०३/२०२४ रोजी देणार असून त्याच्यामध्ये टँकरची व्यवस्था करण्यासाठी मागणी करणार आहे असे पत्रकारांशी बोलताना सरपंच भारत वाघमारे यांनी सांगितले

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# रविकांत तुपकरांचं ठरलं २ एप्रिल रोजी लोकसभेचा उमेदवारी अर्ज दाखल करणार...

**जनसंचलन/बुलढाणा**

शेतकरी नेते रविकांत तुपकर हे जनतेच्या आग्रहास्तव बुलढाणा लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरले असून २ एप्रिल रोजी अर्ज दखल करणार असल्याची घोषणा त्यांनी सातगाव (ता.जि.बुलढाणा) येथील निर्धार मेळाव्यात केली. त्याचबरोबर अर्ज दाखल करण्यासाठी शेतकरी, कष्टकरी, तरुण व शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन देखील त्यांनी केले आहे. २२ मार्च रोजी बुलढाणा तालुक्यातील सातगाव येथे झालेल्या निर्धार परिवर्तन सभेनिमित्त रविकांत तुपकरांनी गावकऱ्यांशी संवाद साधला. या सभेला गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत होणाऱ्या परिवर्तनाच्या लढाई सोबत असल्याचा शब्द यावेळी गावकऱ्यांनी तुपकरांना दिला. यावेळी सातगाव येथील पुरुषोत्तम पालकर यांनी लोकसभा निवडणुक लढविण्यासाठी ११ हजार १११ रुपये निधी रविकांत तुपकरांना दिला.रविकांत तुपकरांनी लोकाग्रहास्तव लोकसभा निवडणुक लढविण्याची घोषणा केल्यानंतर त्यांना जिल्हाभरात मोठा पाठिंबा मिळतांना दिसत आहे. लोक त्यांना निवडणूकीसाठी मोठ्या प्रमाणात लोकवर्गणीही देत आहे. तुपकरांनी संपूर्ण जिल्हा पिंजून काढला असून त्यांच्या सभांना लोकं तुफान गर्दी करीत आहेत. सध्या तुपकरांची एक लाट निर्माण झाल्याचे चित्र आहे. महायुतीचे उमेदवार व रविकांत तुपकरांमध्ये लढत होण्याची चिन्हे सध्या मतदारसंघात दिसत आहेत. बाकी पक्षाचे उमेदवार ठरण्याआधीच आता रविकांत तुपकरांनी २ एप्रिल रोजी अर्ज दाखल करण्याची घोषणा केली असून अर्ज भरण्यासाठी व परिवर्तनाच्या लढाईत सहभागी होण्यासाठी शेतकरी, कष्टकरी, तरुण



व सर्वसामान्य नागरिकांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन देखील त्यांनी सातगाव येथे बोलतांना केले आहे.यावेळी मंचावर गजानन लांडे-पाटील, तुळशीराम काळे, नंदभाऊ शिंदे, भगवान देठे, शिवाजीभाऊ पालकर, उत्तमसिंग पालकर, पवन देशमुख, सदाशिव जाधव सर, आकाश माळोदे, दत्तात्रय जेऊघाले, दगडूभाऊ साखरे, गुलाब तायडे, अरुण पन्हाळकर, अरुण नेमाने, पवन बाकरे, अमोल देवकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. तर गावातील तरुणांनी या सभेचे उत्कृष्ट नियोजन केले होते.

# अनुदानापासून शेतकरी वंचित कृषी सहायकाचा प्रताप मंगरूळ येथील घटना तक्रार दाखल

**जनसंचलन/ चिखली**

चिखली तालुक्यातील मौजे मंगरूळ येथील शेतकऱ्यांनी चिखली तालुका न्याय दंडाधिकारी तहसीलदार काकडे साहेब यांच्याकडे मंगरुळ येथील कृषी सहाय्यक जोगदंडे यांनी मंगरूळ येथील चुकीचा सर्वे करून घरी बसून सर्वे केल्याचे निदर्शनास आल्यामुळे चिखली तालुका कृषी अधिकारी व चिखली तालुका न्यायदंडाधिकारी तहसीलदार काकडे साहेब यांच्याकडे रितसर तक्रार दाखल केली आहे त्यामध्ये त्यांनी नमूद केले आहे की चिखली तालुका व जाफराबाद तालुका हादी वर असलेले मंगरूळ हे गाव अतिवृष्टीने हरभऱ्याचे जे नुकसान झाले होते त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी शेतामध्ये खरोखर हरभरा पेरला होता त्या शेतकऱ्यांना वंचित ठेवून कृषी सहाय्यकाच्या जवळच्या लोकांना कृषीअधिकारी जोगदंड यांनी लाभ दिल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे मंगरूळ येथे नुकसानीच्या ५० टक्के नुकसान झालेले शासनाचा नियम असताना सुद्धा कृषी सहाय्यक जोगदंड यांनी आपल्या जवळच्या लोकांना शंभर टक्के अनुदान दिले आहे आणि ज्या शेतकऱ्याचे खरोखर नुकसान झाले त्या शेतकऱ्यांना वंचित ठेवले आहे कृषी सहाय्यक जोगदंडे यांनी काही शेतकऱ्यांना हेतुपुरस्कार टाळले असल्याचे दिसून येत आहे तर ज्या शेतकऱ्यांच्या शेतामध्ये हरभऱ्याच नाही त्यांना शंभर टक्के अनुदान दिले आहे हे काही सुज्ञ शेतकऱ्यांच्या लक्षात आल्यामुळे त्यांनी चिखली तालुक्याचे न्याय दंडाधिकारी तहसीलदार काकडे साहेब यांच्याकडेच तक्रार करून मंगरूळ येथे झालेला सर्वे हा चुकीचाच आहे असे लेखि तक्रार दिली चिखली तालुका न्याय दंडाधिकारी श्री काकडे साहेब यांनी जो सर्वे चुकीचा झाला आहे तो परत करण्यात येईल असे लेखी पत्र दिले परंतु ज्या शेतकऱ्यांची नावे कृषी सहाय्यक जोगदंडे यांनी यादी तयार केली होती त्या लोकांना शंभर टक्के अनुदान मिळाले आहे ही एक शासनाची फसवणूकच झाली आहे या बाबतीत जिल्हा अधिकारी साहेब यांच्याकडे रितसर तक्रार दाखल करण्यात येणार आहे जोगदंडे यांनी हे आपसात वाटाघाटी करून केल्याचे दिसून येत आहे मंगरूळ येथे तलाठी व कृषी सहाय्यक यांना हे काम शासनाने दिले होते परंतु तलाठी चव्हाण यांनी इसरुळ येथे सर्वे केला व कृषी सयक जोगदंडे यांनी मंगरूळ येथे सर्वे केला जोगदंडे यांनी मंगरूळ येथे चुकीचा सर्वे करून काही शेतकऱ्यांना हाताशी धरून घरी बसूनच सर्वे केल्या चे दिसुन येत आहे ऑक्टोबर महिन्यात झालेल्या पावसामुळे शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले परंतु शासनाच्या नियमानुसार येथे फक्त पन्नास टक्केच नुकसान भरपाई मिळणार होती परंतु जोगदंडे यांनी स्वतःच्या भल्यासाठी काही लोकांना सर्व नियम धाब्यावर बसून शंभर टक्के नुकसान भरपाईचे अनुदान आपल्या मर्जीतील शेतकऱ्यांना देण्यात आले आहे त्याची चौकशी करण्यात यावी मंगरूळ येथील शेतकऱ्यांची प्रतिक्रिया घेतली असता सदर कृषी सेवक हे गावातील नाका डोळ्याच्या लोकांनाच हाताशी धरून कोणतेही काम करतात त्यामुळे त्यांची मंगरूळ येथून बदली करण्यात यावी व झालेल्या भ्रष्टाचाराबाबत सुद्धा चौकशी करण्यात यावी अशी माहिती मंगरूळ येथील परमेश्वर सुरूशे यांनी दूरध्वनीवरून दिली आहे तसेच या अर्जावर मंगरूळ येथील अन्यायग्रस्त शेतकरी यांच्या सुद्धा भरपूर सही आहे

# मतदार नोंदणी करून लोकशाही बळकट करा - उपजिल्हाधिकारी श्री. राजेंद्र पोळ

# विवेकानंद आश्रमात वृक्षपुजनाने होळी साजरी...

**जनसंचलन/हिवराआश्रम**

भारतीय लोकशाही ही जगातील सर्वोत्तम लोकशाही आहे. मतदारांना आपला राजा निवडण्याचा अधिकार लोकशाहीने दिलेला आहे. मतदान करून आपण आपले कर्तव्य पार पाडणे व मतदान करण्यासाठी मतदार नाव नोंदणी अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येकाने आपले नाव यादीमध्ये नोंदवावे असे आवाहन बुलडाणा जिल्हयाचे उपजिल्हाधिकारी श्री. राजेंद्र पोळ साहेब यांनी विवेकानंद आश्रमात आयोजित वृक्षपुजन कार्यक्रमात कृषि महाविद्यातील विद्यार्थ्यांसमोर बोलतांना व्यक्त केले. आश्रमात दरवर्षी होळीच्या दिवशी वृक्षपुजन करून होळीचा उत्सव साजरा करण्यात येतो. प.पू.शुकदास महाराजश्रींनी वृक्षपुजन करून निसर्गाचे संवर्धन करून होळीचा उत्सव साजरा करण्याची परंपरा सुरू केली होती. त्यानुसार दरवर्षी वृक्षपुजन कार्यक्रमाचे आयोजन केल्या जाते. आज दि.२४ रोजी हा सोहळा विवेकानंद कृषि महाविद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या सुरूवातीला उपजिल्हाधिकारी श्री.



राजेंद्र पोळ साहेब यांच्या हस्ते आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना साखरगाठींचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनी कठोर मेहनत करून यश संपादनासाठी प्रयत्नशील राहावे. शेती आणि मातीशी नाते असलेला पदवीधर देशाची अन्न व्यवस्था ठरवितो व जनतेचे पालन पोषण करणारा घटक ठरतो. त्यासाठी संशोधनाच्या मार्गाने जावून कृषि क्षेत्र अधिकाधिक समृध्द करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाच्या सुरूवातील कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभाष कालवे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. विवेकानंद आश्रमासारखी ग्रामीण भागात काम करणारी धर्मदाय संस्था ही लाखो ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी वरदान आहे. ग्रामीण भागात दडलेले टॅलेंट, संघर्ष करण्याची व अभ्यास करून मुख्य प्रवाहात येण्यासाठी धडपणारे विद्यार्थी यांच्यासाठी आश्रमासारख्या संस्था दिपस्तंभ ठरणार आहेत. असे विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. समाधान जाधव यांनी केले. यावेळी तलाठी पी.आर.रहाटे, विवेकानंद आश्रमाचे पदाधिकारी, पत्रकार बांधव, विवेकानंद कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

बुलढाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

# दुचाकी व फोरव्हिलरचा हतडीजवळ भीषण अपघात...

## अपघातमध्ये दुचाकीस्वार जखमी तर १ जण ठार

**जनसंचलन/बुलडाणा**

धाड रोडजवळ हतडी गावाजवळ दुचाकी व फोरव्हिलरचा भीषण अपघात झाला आहे.या अपघातामध्ये एक जण ठार झाले आहे. तर एक जण गंभीर जखमी झाला आहे.हा अपघात दि २४ मार्च रोजी घडला आहे.या अपघात मध्ये ठार झालेले व्यक्ती हे बुलढाणा येथील आहे.सविस्तर वृत्त असे की, दुचाकी स्वार विशाल चव्हाण रा. सुंदरखेड व शिवाजी म्हातारजी रा.सुंदरखेड हे दुचाकीने केसापूर येथील शेतामधून घराकडे बुलढाणाकडे येत होते. तर अल्टो कार एमएच २८ ए झेड,३८२६ने धाडच्या दिशेने जात होते. कार चालक प्रमोद तुपकर रा.गुंज ता.मेहकर यांनी त्यांच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व




निष्काळजीपणाने चालवून विशाल चव्हाण यांच्या दुचाकीला जबरदस्त धडक दिली आहे.या अपघातामध्ये विशाल चव्हाण हे गंभीर जखमी झाले आहे तर त्यांच्या सोबत असलेले शिवाजी म्हातारजी चव्हाण हे अपघातामध्ये ठार झाले आहे.घटनेची माहिती मिळताच बुलढाणा ग्रामीण पोलिस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले पंचनामा करून कार चालक यांच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.सदर घटनेचा पुढील तपास पो. हे.कॉ गजानन काकडे हे करित आहे

# शवेद बायोटेक-ऊती संवर्धन व पुनरुत्पादन लॅब ला बीएससी च्या विद्यार्थ्यांची भेट

**जनसंचलन/ लोणार**

स्थानिक, लोणार येथील कै. कु. दुर्गा क. बनमेरू विज्ञान महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र व सूक्ष्मजीवशास्त्र या विषयाच्या बीएससी प्रथम द्वितीय व तृतीय वर्गातील विद्यार्थ्यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती सीबीसीएस पॅटर्न अभ्यासक्रमानुसार संबंधित इंडस्ट्री ची माहिती व कौशल्य अंगीकृत करण्यासाठी ईशवेद बायोटेक प्रा. लि. सिंदखेड राजा जि. बुलढाणा या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या वनस्पती ऊती संवर्धन व पुनरुत्पादन (प्लांट टिशू कल्चर लॅब) ला दिनांक १६ मार्च २०२४ रोजी भेट दिली. या दरम्यान वनस्पती ऊती संवर्धन व पुनरुत्पादन या संदर्भातील सर्व प्रक्रिया जसे की, वनस्पतींची निवड, त्यांचे निर्जंतुकीकरण, वनस्पतींच्या वाढीसाठी आवश्यक असणाऱ्या कृत्रिम पोषकतत्वे यांची मात्रा व त्यापासून तयार केलेला कल्चर मीडिया, वनस्पतींच्या उती कल्चर मीडिया वरती वाढवण्याची प्रक्रिया व प्रयोगशाळा ते हरितगृह व छावणी या दरम्यान ऊती संवर्धनातून निर्माण झालेल्या रोपांवर केलेली प्रक्रिया, जागतिक कृषी क्षेत्रात मागणी असलेल्या व अर्थाजन देणाऱ्या वनस्पतींची रोपे ऊती संवर्धनातून कशाप्रकारे तयार केली जातात व ती कोणकोणत्या भौगोलिक परिस्थितीमध्ये, पर्यावरण दृष्ट्या आवश्यक हवामानानुसार त्यांची पुनर्लागवड कशा प्रकारे केली जाते या अशा अनेक व्यापारी दृष्ट्या महत्त्वाच्या बाबतीत संपूर्ण मार्गदर्शन ईश्वर बायोटेक चे संचालक सन्माननीय श्री.अक्षय वायाळ, स्नेहल मॅडम व इतर वैज्ञानिक व कर्मचारी वर्ग यांनी विद्यार्थ्यांना करून दिली. यासोबतच ईशवेद बायोटेक कंपनीचे संस्थापक भूमिपुत्र सन्माननीय श्री. संजय वायाळ व श्री. संदीप बोरा यांच्या प्रेरणादायी प्रयासाने आंतरराष्ट्रीय दर्जाची वनस्पती ऊती संवर्धन व पुनरुत्पादन करणारी आशिया खंडातील सर्वात मोठी कंपनी याविषयी देखील विद्यार्थ्यांस मार्गदर्शन केले व त्यातून विद्यार्थ्यास आपले भवितव्य घडविण्यासाठी प्रेरणा मिळाली. या शैक्षणिक सहली दरम्यान अनुभवलेल्या सर्व गोष्टींबाबत अहवाल विद्यार्थी महाविद्यालयात सादर करणार आहेत व त्यास अंतर्गत गुणदान देखील मिळणार आहे. या इंडस्ट्रियल व्हिजिट करिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश बनमेरू यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले तसेच सदर विद्यार्थ्यांस इशवेद बायोटेक या ठिकाणी घेऊन जाण्यासाठी वनस्पतीशास्त्र विभागातील प्रा. डॉ. महेंद्र भिसे व सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील प्रा. निशिगंधा खुळे यांचे मार्गदर्शन लाभले. या शैक्षणिक सहली दरम्यान एकूण ४४ विद्यार्थी सहभागी झाले होते.

# बुलढाण्यात वाहतूक नियमांची कठोर अंमलबजावणी...

## ट्रिपल सीट,मोबाईल वर बोलणाऱ्यांवर धडक कारवाई...

### कारवाईच्या धडाक्याने बुलढाणा शहरात वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न

**जनसंचलन/बुलडाणा**

बुलढाणा जिल्ह्यात वाहतूक पोलिसांनी वाहतुकीच्या नियमांची कठोर अंमलबजावणी सुरू केली आहे. यामध्ये ट्रिपल सीट चालणारे तसेच मोबाईलवर बोलत असताना वाहने चालवणाऱ्यांवर मोठ्या प्रमाणात कारवाई केली जात आहे. अल्पवयीन मुलांना देखील वाहने चालवण्यास मज्जाव केला जातोय. बुलढाणा शहरातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी बुलढाणा वाहतूक पोलिसांनी मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेच्या माध्यमातून वर्दळीच्या सर्कुलर रोड परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक नियमांचा भंग करणाऱ्यांवर कारवाई केली जात आहे. त्यामुळे बुलढाणा



शहरातील वाहतूक सुरळीत होण्यास मदत होत आहे.रोज ५० ते ८० कार्यवाही करण्यात येत आहे.पीआय.राठोड यांनी हि धडाकेबाज मोहिम सुरू केली आहे.




# विठ्ठलवाडी गावांत तुफान हाणामारी सात जण गंभीर जखमी...

## मेहेकर तालुक्यातील घटना,होळी दहणाच्या वेळी लहान मुलांच्या भांडणातून घडली घटना...

**जनसंचलन/मेहकर**

मेहकर तालुक्यातील विठ्ठलवाडी येथे होळी दहनाच्या वेळी लहान मुलांच्या भांडणातून दोन गटात तुफान राडा झालाय. यात सहा ते सात जण गंभीर जखमी झाले असून जखमींना मेहकर येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आल् आहे. मात्र जखमींपैकी चार जणांची प्रकृती



गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी सामान्य रुग्णालय बुलढाणा येथे पाठविण्यात आल आहे. सध्या गावात पोलिसांचा मोठा फौजफाटा पोहचला असून तणावपूर्ण शांतता आहे....

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958